Vol 3 Issue 8 Sept 2013

ISSN No : 2230-7850

Monthly Multidisciplinary Research Journal

# Indian Streams Research Journal

Executive Editor

Ashok Yakkaldevi

Editor-in-chief

H.N.Jagtap

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## *International Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya [ Malaysia ]

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus Pop

Mohammad Hailat
Dept. of Mathmatical Sciences, University of South Carolina Aiken, Aiken SC 29801

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Catalina Neculai
University of Coventry, UK

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Department of Chemistry, Lahore University of Management Sciences [ PK ]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Horia Patrascu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

Nawab Ali Khan
College of Business Administration

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University, Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU, Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Ph.D , Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.net**

Indian Streams Research Journal
Volume-3, Issue-8, Sept-2013
ISSN 2230-7850
Available online at www.isrj.net

# भारतीय लोकशाहीसमोरील भ्रष्टाचार निर्मुलनाचे आव्हान

**मेघा संजय पाटील**

मालती वसंतदादा पाटील कन्या महाविद्यालय, इस्लामपूर, ता. वाळवा, जि. सांगली, महाराष्ट्र.

***सारांश :***भारताची आजची आर्थीक, सामाजिक, राजकीय परिस्थिती व प्रगती (विकास) या विषयांच्या विविध अंगाचा अभ्यास भ्रष्टाचार या विशयाला वगळून होणार नाही, इतका भ्रष्टाचार हा सर्वाचार झाला आहे. भ्रष्टाचाराचे हे संकट भारतीय लोकशाहीला भयावह व घातक ठरू पहात आहे. जेथे तेथे अधिकार आणि सत्ता असते तेथे तेथे भ्रष्टाचाराची शक्यता निर्माण होते. आज वर्तमानपत्राातून येणा—या भ्रष्टाचाराच्या बातम्या केवळ आपल्या चर्चेचा विषय होतात. पण परिणामांचा विचार करतांना आपण संवेदनहीन होत असतोच. परंतु या समस्येमुळे राष्ट्राचेच अधःपतन होणार आहे, याची फारच थोडया लोकांना जाणीव असते. स्वातंत्र्योत्तर काळात केंद्र शासनाने नवनविन विकास योजना, कल्याणकारी योजना सुरू केल्या. या योजना राबविण्यासाठी नवनविन कायदे, नियम, परवाने, नियंत्रणे निर्माण केली की जी भ्रष्टाचाराला कारणीभूत ठरली गेली. भ्रष्टाचारामुळे भारतातील राजकीय व्यवस्थेवरील तणावही सातत्याने वाढत आहे. राजकीय संस्थांनी आपले मनोधैर्य, नैतिकता गमावल्यामुळे देशात चांगल्या प्रकारे सत्ता राबवणे कठीण बनले आहे. भारतीय लोकशाहीचे अविभाज्य अंग असणा—या निवडणूका भ्रष्टाचाराची गंगोत्री बनल्या आहेत, याची मुख्य निवडणूक आयुक्त एस. वाय. कुरेशी यांनीही कबुली दिली आहे. राज्यकर्ते, शासकीय नोकरवर्ग यांनी भ्रश्टाचार करू नये म्हणून ज्या उपाययोजना सांगितल्या त्या प्रत्यक्षात उतरणे व त्याची अंमलबजावणी करणे फारसे प्रभावी ठरले नाही. कारण त्यात अनेक दोश होते. जीवनातील नितीमुल्यांचा —हास झाला किंवा जीवनमूल्ये बदलली की भ्रष्टाचारात वाढ होते. प्रतिसाद जबाबदारी आणि पारदर्शकता या गोश्टी ही राजकारण, प्रशासन आणि समाजकारणातून लोप पावतांना दिसत आहे.

की वडर्स : भ्रष्टाचार, राजकारण, प्रशासन, लोकशाही, संस्था, नितीमत्ता, निवडणूका.

***प्रस्तावना :***

स्वातंन्त्र्यापूर्वी भारतातील अनेक राजकीय नेत्यांनी त्यांच्या घरादाराचा त्याग करून देशासाठी स्वतःला सामाजिक कार्यात पूर्णपणे झोकून दिले होते. मात्र सत्तेत सहभाग नसल्याने भारतात भ्रष्टाचार नव्हता. इंडियन कौन्सिल ॲक्ट 1935 नुसार 1937 साली राज्यात विधिमंडळाच्या निवडणूका घेण्यात आल्या त्यात कॉंग्रेसने विजय प्राप्त करून अकरा पैकी आठ राज्यात सरकार स्थापन केले. परंतु सत्ता हाती येताच कॉंग्रेसमधील अनेक आमदार व मंत्री यांच्या विरूध्द लाचलुचपत व भ्रष्टाचाराचे आरोप झाल्याचे दिसते. आज भ्रष्टाचाराचे रूपांतर शिष्टाचारात झाले आहे. भ्रष्टाचार विरहित सरकारी निमसरकारी कार्यालये, उद्योगधंदे, कारखाने, सहकारी संस्था, वित्तीय संस्था शोधून सापडणे अशक्य बनले आहे. भ्रष्टाचार हा शब्द आपण दैनंदिन जीवनात क्षणोक्षणी ऐकतो भ्रश्टाचार हा शब्द भ्रष्ट + आचार या दोन शब्दापासून तयार झालेला असून त्याचा अर्थ प्रचलीत निती — नियम यांच्या विरूध्द अप्रामाणिक वर्तन करून अवैध मार्गाने सत्ता संपत्ती मिळवणे, पदाचा गैरवापर करणे, संसदीय नियमांचे उल्लंघन करणे असा होतो. भ्रष्टाचार हा चार अक्षरी शब्द छोटा वाटत असला तरी त्याने निर्माण केलेल्या प्रश्नांची व्याप्ती फार मोठी आहे. वैयक्तीक स्वार्थ, सामाजिक बेफिकिरी, हताशपणा व लाचारी असेही भारतातील भ्रष्टाचाराचे वर्णन करता येईल.

भारतात भ्रष्टाचार प्राचीन काळापासून अस्तित्वात आहे. कौटिल्याने आपल्या अर्थशास्त्र या ग्रंथात सरकारी नोकरांकडून राज्याच्या महसुलातील पैशाच्या होणा—या अपहाराचे वर्णन केले आहे. मध्ययुगात कर वसूल करण्याचे अधिकार मर्यादीत लोकांच्या हाती असल्यामुळे भ्रश्टाचाराची व्याप्ती मर्यादीत राहिली. त्यानंतर ब्रिटिश राजवटीत केवळ भारतीय अधिकारीच नव्हे तर उच्च पदस्थ ब्रिटिश अधिकारी ही लाच घेत होते. पहिल्या व दुस—या महायुध्दाच्या काळात आर्थिक क्रियांच्या झालेल्या विस्ताराने भ्रष्टाचाराच्या अनेक मार्गांना जन्म दिला. स्वातंन्त्र्योत्तरकाळात पहिल्या काही दशकात उच्च पातळीवरील राजकीय नेते मोठया प्रमाणात प्रामाणिक राहिले. त्यानंतर मात्र नेते मंडळी अप्रामाणिक वागू लागली. भारतात राजकीय, सामाजिक, आर्थिक, पोलीस, न्यायव्यवस्था, शिक्षण, आरोग्य संरक्षण इत्यादी क्षेत्रात भ्रश्टाचाराची पाळेमुळे खोलवर गेलेली आहेत. देशातील निरनिराळया क्षेत्रात आजवर झालेल्या भ्रश्टाचाराची काही प्रकरणे नजरेसमोर आणली तरी या संकटाने किती आक्राळ—विक्राळ स्वरूप धारण केले आहे, याची आपणांस कल्पना येते. बोफोर्स घोटाळा शस्त्रास्त्र खरेदी— विक्री घोटाळा, तेलगी, हर्षद मेहता चारा घोटाळा, 2G स्पेक्ट्रम घोटाळा, आदर्श घोटाळा हे सर्व भ्रष्टाचाराचे विकृत नमुने आहेत. हे नमुने म्हणजे अवाढव्य स्वरूपाच्या हिमनगाचे केवळ टोक आहेत. भ्रष्टाचाराच्या बाबतीत केंद्रिय मंत्रालये, पेट्रोलियम संरक्षण, ऊर्जा व दळणवळण यांचा उल्लेख पैसा मिळवून देणा—या सोन्याच्या खाणी असाच केला जातो. या चारही मंत्रालयाकडून खर्ची पडणा—या बजेटमागे पंधरा ते चाळीस टक्के कमिशन मंत्री व मंत्राालयातील नोकरांना मिळते. एखाद्या प्रोजेक्टच्या एकूण मंजूर रक्कमेपैकी सत्तर टक्के पैसा कामासाठी वापरला जातो. वीस टक्के कॉन्ट्रॅक्टर व दहा टक्के पैसा वेगवेगळया सरकारी अधिका—यांच्या खिशात जातो. जेथे कर आकारणी कॉन्ट्रॅक्ट मंजूर करणे, बिले मंजूर करून चेक देणे अशा महत्वाच्या बाबी संबंधी निर्णय घेणा—या विभागात भ्रश्टाचाराची व्याप्ती अधिक आढळते. दिल्लीपासून गल्लीपर्यंत पुरेशी लाच दिली गेली नाही तर कुठल्याही निर्णयावर शिक्का बसत नाही. लाचेची रक्कम तया व्यवहाराच्या आर्थिक महत्वावर निर्णय घेणा—या व्यकतीच्या स्थानमहात्म्यावर ठरत असते. आज लाच देणे घेणे हे जीवनाचे अविभाज्य अंग बनले आहे. जीवनातील नीती मूल्यांचा —हास झाला आहे.

भारतीय उद्योग महासंघाने ;फिकीद्ध इंग्लंडच्या अर्नस्ट व यंग या संस्थेमार्फत नुकताच लाचखोरी व भ्रष्टाचाराबाबतचे भारतीय वास्तव यासंदर्भात एक सर्व्हे केला त्यामध्ये शासन व सार्वजनिक उद्योग ही क्षेत्रे भ्रष्टाचार व लाचखोरीत प्रथम क्रमांकावर आहेत.त्यानंतर परिसेवा बांधकाम, स्थावर, खाणकाम, संरक्षण, ऊर्जा या क्षेत्रांचा क्रमांक लागतो. भ्रष्टाचाराची वाढती व्याप्ती देशाचे चलन कमकुवत करण्यास, गुंतवणूक घटविण्यास कारणीभूत ठरत असल्याचे मत उच्च पदस्थ अधिका—यांनी व्यक्त केले आहे. प्रचंड साधनसंपत्ती असणारा, कुशल मनुष्यबळ असणारा व जगातील तिसरी मोठी अर्थव्यवस्था म्हणून ओळखला जाणारा भारत लाचखोरी आणि भ्रष्टाचार यात अडकून पडला आहे. भारतातील राजकीय व्यवस्थेवरील तणावही सातत्याने वाढत आहे. परिणामी राजकीय व्यवसथा कमजोर बनत आहे. लोकांच्या वाढत्या गरजा (अपेक्षा) राजकीय जागृती, सामाजिक बदल यांनी निर्माण केलेल्या आव्हानांना राजकीय व्यवस्था पुरेसा प्रतिसाद देवू शकत नाही. परिणामतः राजकीय संस्थांनी आपले मनोधैर्य गमावले आहे. त्यामुळे देशात चांगल्या प्रकारे सत्ता राबवणे कठीण बनले आहे. अस्थिर शासन वरचेवर होणा—या निवडणूका, भिन्न सामाजिक गट आणि वर्गाच्या स्पर्धात्मक मागण्या आणि गरजा यामध्ये तडजोड घडवून आणण्यातील असमर्थता, कायदा आणि सुव्यवस्थेतील दुर्बलता, दंगली, वाढत जाणारा भ्रष्टाचार आणि सर्वात महत्वाचे म्हणजे आपल्या धोरणांची अंमलबजावणी करण्यांत किंवा कार्यक्षम शासन देण्यांत केंद्राला आणि राज्याला आलेले अपयश हे सर्व चांगल्या प्रकारे राजकीय सत्ता राबविण्यांत येणारे अडथळे आहेत. लोकशाहीचे सर्वोच्च मंदिर, देशाचा सर्वात मोठा शोध या शब्दात नेहरूंनी ज्या संसदेचा गौरवपूर्ण उल्लेख केला होता ती आज मात्र ओळखू न येण्याएवढी खालावली आहे. दहाव्या लोकसभेतील ही घटना धक्कादायक म्हणावी लागेल. अविश्वास ठरावास सरकारला पराभवापासून वाचविण्यासाठी सत्ताधारी पक्षाने झारखंड मुक्ती

मोर्चाच्या सदस्यांची मते उघडपणे विकत घेतली हे प्रकरण भारताच्या संसदीय लोकशाहीच्या नैतिकतेबाबतची सर्वात लाजिरवाणी घटना मानावी लागेल. संसदेची व राज्य विविधमंडळाची अधिवेशने आरडाओरड, निंदा, बेलगामवर्तन, वारंवार सभा तया गरणे, निदर्शन, धरणे यामुळे गाजत आहेत. लोकसभेत वापरलेले न शोभणारे शब्द व वाक्यप्रचार यांची लोकसभा सचिवालयाने जी यादी तयार केली आहे तो एक नऊशे पानांचा ग्रंथ आहे. सभापती सोमनाथ चटर्जी यांच्या कार्यकालात बैठकांच्या एकूण 1738 तास 45 मिनिटांपैकी बेशिस्त वर्तन व व्यत्यय या कारणाने बैठक स्थगित करण्यामुळे 423 तास वाया गेले. संसदेच्या प्रत्येक मिनिटाच्या कामकाजाचा खर्च 17000/– रूपये येतो. म्हणजेच तासाला दहा लाख रूपये खर्च होतात. यावरून संसदेचे वाया गेलेले तास आणि त्यासाठी खर्च झालेली रक्कम याचा हिशोब केला तर संसदेने देशाचे किती तरी कोटी रूपये वाया घालवल्याचे दिसून येते. या पार्श्वभूमीवर आमदार खासदारांनी हे लक्षात ठेवले पाहिजे की, मतदारांनी त्यांना संसदेत जावून कामकाज करण्यासाठी निवडून दिले आहे. वारंवार सभा त्याग करून बाहेर पडण्यासाठी नाही हे प्रसिध्द विधिज्ञ व खासदार एल.एम. सिंघवी यांनी अधोरेकित केलेले वक्तव्य योग्य असल्याचे दिसून येते.

निवडणूका हे लोकशाहीचे अपरिहार्य आणि अविभाज्य अंग आहे. निवडणूकीच्या माध्यमातून लोकांच्या इच्छा प्रकट होतात. लोकांच्या दैनंदिन प्रश्नांची सोडवणूक करण्याचे आश्वासन निवडणूकीच्या वेळी देणारे लोकप्रतिनिधी निवडून आल्यानंतर पुढच्या निवडणूकीपर्यंत मतदारांकडे फिरकतही नाहीत. निवडणूका या काळा पैसा व भ्रश्टाचाराची गंगोत्री मानल्या जातात. निवडणूकीतील भ्रश्टाचाराला पायबंद घालण्यासाठी निवडणूक आयोगाने विविध उपाययोजना सुचविलेल्या आहेत. आज निवडणुका म्हणजे पैसा हे समीकरणच बनलेले आहे. यावर्शी प्रथमच निवडणूक आयुक्त एस. वाय. कुरेशी यांनी निवडणूक प्रचारातल्या पैशाच्या ओघाची कबुली दिलेली आहे. त्यांनी पुढे असेही म्हटले आहे की, पैशाची ताकद ही अशी गोश्ट आहे की, जिच्यावर आम्ही अजूनही नियंत्रण ठेवू शकलेलो नाही. लोकशाही प्रणालीत पक्ष स्थापन करणे तो टिकविणे, निवडणूक लढविणे व ती जिंकणे, सत्ता मिळविणे, टिकविणे यासाठी पैशाची आवश्यकता असते. भारतात मूठभर श्रीमंताची बहुसंख्य गरीबांवर अधिसत्ता असून लाचलुचपत व भ्रश्टाचार या मार्गानी निवडून आलेले अप्रामाणिक लोकप्रतिनिधी सामान्य भारतीयांवर राज्य करतात ही राज्यघटनेची शोकांतिका असून देशाच्या संसदीय लोकशाहीस लागलेले ग्रहण आहे. भारतात भ्रष्टाचाराचा गंभीर प्रश्न निर्माण झालेला आहे आणि भ्रष्टाचार निर्मुलन हा देशापुढील एक ज्वलंत प्रश्न बनला आहे. या पार्श्वभूमीवर भ्रश्टाचाराला कारणीभूत ठरलेल्या घटकांचा शोध घेणे त्यांची मिमांसा करणे आवश्यक आणि गरजेचे आहे.

***भ्रष्टाचाराची कारणे :–***

1.राजकीय अस्थिरता
2.सत्ता व संपत्तीची हाव
3.निवडणूक पध्दत व निवडणूक खर्च
4.मनुष्य स्वभाव
5.आर्थिक असुरक्षितता
6.प्रशासकीय विलंब
7.लायसन्स व परमिटराज
8.बेसुमार लोकसंख्या वाढ
9.सामाजिक विषमता, दारिद्रय
10.नोकरशाहीचे वाढते प्राबल्य
11.लालफितीचा कारभार
12.कडक शिक्षेचा अभाव

***भ्रष्टाचाराचे परिणाम :–***

भ्रष्टाचाराच्या मार्गाने पैसा मिळविणे किंवा भ्रष्ट मार्गाने एखादे काम करवून घेणे हा नैतिकदृष्टया व कायद्याने गुन्हा समजला जातो. अशा प्रकारच्या गुन्हयात अनेक लोक सामील होतात. भ्रष्टाचारामुळे व्यक्ति – कुटुंब – समूह– समुदाय – समाजाला कमालीचे दुष्परिणाम भोगावे लागतात. भ्रष्टाचार जेंव्हा घडतो तेंव्हा ती वैयक्तीक बाब रहात नाही. भ्रष्टाचाराचा परिणाम देशाच्या, समाजाच्या नैतिक आर्थिक, सामाजिक, राजकीय, क्षेत्रावरही होतो. भ्रष्टाचार हा कायद्याने गुन्हा आहे. परंतु हा गुन्हा म्हणजे दोन व्यक्तिमधील बाब नसून ते एक समाजाविरोधी कृत्य ठरते. भ्रष्टाचाराच्या मुळाशी अर्थकारण व दैनंदिन व्यवहारातला तडजोडीचा घनिश्ठ संबंध आहे. भ्रष्टाचारामुळे देशाच्या विकासावर परिणाम होतो.

1.कायदा व सुव्यवस्थेवर गंभीर परिणाम होतो.
2.भ्रष्टाचार समाज विकासातील अडसर ठरतो.
3.समाजिक नितीमुल्यांचा –हास होतो.
4.संघटित गुन्हेगारी व पांढरपेशीय गुन्हेगारीत वाढ होते.
5.देशाच्या विकासकामात अडथळे निर्माण होतात.
6.विलासी जीवन जगण्याकडे लोकांचा कल वाढतो.
7.सरकारी महसूलात घट होते.
8.सरकार व प्रशासनविषयी लोकांच्यातील विश्वासार्हता संपुष्ठात येते.
9.कायद्याच्या राज्यास धोका पोहचतो.

***भ्रष्टाचारावरील उपाययोजना :–***

भारतासारख्या देशात अति उच्च टोकाला गेलेला भ्रष्टाचार संपवून आकणे अशक्य असले तरी सकारात्मक दुष्टिकोनातून काही उपाययोजना केल्या तर भ्रष्टाचाराचे प्रमाण कमी करणे शक्य आहे. भ्रष्टाचार निर्मुलनासाठी सरकारने अनेक (कायदे ) उपाय योजले आहेत. कायदेशीर उपायाबरोबरच सार्वजनिक जीवनातील व्यक्तिची नैतिक पातळी उचावणे हा भ्रश्टाचार निर्मुलनातील महत्वाचा टप्पा ठरू शकतो.

1.भ्रष्टाचार नियंत्रणाचे कायदे स्पष्ट, पारदर्शी असावेत.
2.गुन्हेगारांना कडक व तात्काळ शासन करण्यात यावे.
3.वस्तुंची बनावट कमतरता व तुटवडा कमी करणे.
4.कालबाह्य कायदे रद्द वा दुरूस्त करणे.
5.देशात राजकीय स्थिरता निर्माण करणे.
6.कर चुकवेगिरीस आळा घालणे.
7.नोकरशाहीतील भ्रष्टाचारास आळा घालणे.
8.मनुष्यबळाचा विधायक कामासाठी उपयोग करून घेणे.
9.सामाजिक नैतिकतेस चालना देणे.
10.प्रशासकीय नैतिकता वाढवणे.
11.भ्रष्टाचाराविरूध्द सरकार, जनता यांनी एकत्रितपणे लढा देणे (त्यांच्यातील सुसंवाद वाढवणे)
12.सार्वजनिक बहिष्कार व लोकजागृतीचा मार्ग अवलंबावा.
13.साक्षरता, सुजानता, नैतिकता या दुष्टीने समाजपरिवर्तन घडवून आणणे.

भारताला स्वातंन्त्र्य मिळाल्यानंतर कायद्याचा घटनेत समावेश करण्यांत आला. निवडणूकीतील गैरप्रकार टाळावेत म्हणून निवडणूक आयोग आणि न्यायसंस्था यांना अधिकार प्रदान करण्यांत आले. राजकारण आणि सार्वजनिक सेवामधील भ्रष्ट व्यवहारास पायबंद घालण्याच्या उद्देशाने अनेक कायदे करण्यांत आले. तरीही स्वातंन्त्र्यानंतर समाजाच्या विविध क्षेत्रांना भ्रष्टाचाराची लागण झाली. भ्रष्टाचाराचे आगार समजल्या जाणा–या निवडक राष्ट्रांच्या यादीत भारताने स्थान पटकावले. स्वातंन्त्र्यानंतर भारतीय घटनेनुसार लोकांना संपूर्ण लोकशाही व्यवस्था, प्रौढ मताधिकार, कल्याणकारी आदर्श राज्याचे स्वप्न प्रदान करण्यांत आले अथक संघर्षातून मिळविलेले स्वातंन्त्र्य हा आपला निसर्गदत्त अधिकार होता. परंतु त्याबरोबरच आपल्या घटनेतील काही मूल्य विषयक संकल्पना समाजात रूजायला हव्या होत्या त्या रूजल्याच नाहीत. भारतीय लोकशाहीत जनतेचा सहभाग नव्हता. जनतेला भ्रष्टाचार नको होता. परंतु भ्रष्टाचाराला आवर घालणे, जनतेला अशक्य होते. त्यातच जनतेची सेवा करण्याऐवजी तिची लुट करण्याचेच काम राज्यकर्ते आणि नोकरशाहीने केले. सध्याच्या भ्रष्ट व्यवस्थेत बदल घडवून आणायचा असेल तर आपल्याला लोकांना सशक्त करण्यावर भर द्यायला हवा आणि त्यासाठी संस्थात्मक संरचनेत सुधारणा कराव्या लागतील. स्वातंन्त्र्यानंतर उघडकीस आलेली बोफोर्स रोखे घोटाळा, चारा घोटाळा, खासदार लाच घोटाळा, 2G स्पेक्ट्रम, आदर्श इ. प्रकरणे पाहिली असता, कारभारातील पारदर्शकता जबाबदारीचे तत्व आणि सरकारी स्तरावरून दिला जाणारा प्रतिसाद या बाबी वारंवार चर्चेत येत आहेत. प्रतिसाद जबाबदारी आणि पारदर्शकता या तीन संकल्पना एकमेकांना बळकटी आणणा–या आहेत आणि त्यांच्या संयोगातून स्वच्छ सरकार उभे राहू शकते. जनतेला प्रतिसाद देणारी व्यवस्था प्रत्यक्षात येण्यासाठी दुर्बल घटकांच्या गरजांकडे नोकरशाहीला लक्ष द्यायला भाग पाडले पाहिजे. लोकप्रतिनिधींच्या मनातील राज्यकर्ते ही भावना काढून टाकली पाहिजे. याशिवाय राज्यकर्ते व प्रशासकीय अधिका–यांवर चौकशी करून खटले भरणारी सी.बी.आय. ही सरकारी सर्वात प्रतिष्ठेची यंत्रणा आहे. सी.बी.आय. ला स्वतंत्र आणि घटनात्मक अधिकार देण्यांत यावेत. देशातील मुठभर राजकारण्यांच्या हातातील एक खेळणे असे या यंत्रणेचे असलेले सध्याचे स्वरूप जर बदलले गेले तरच राजकीय क्षेत्रातील प्रशासकीय क्षेत्रातील व समाजातील भ्रष्टाचार दूर होण्याची आशा आपण करू शकतो.

*भारतीय लोकशाहीसमोरील भ्रष्टाचार निर्मुलनाचे आव्हान*

***संदर्भ** :–*

1.गिल एस. एस. भ्रष्टांगण परचुरे प्रकाशन मंदिर मुंबई द्वितीय आवृत्ती 2002
2.देशमुख बी. जी. पुणे ते पंतप्रधानांचे कार्यालय मेहता पब्लिशिंग हाऊस पुणे 2008
3.सहस्त्र बुध्दे विनय आहे लोकतंत्र तरीही अमेय प्रकाशन पुणे 2011
4.श्रीवास्तव सी.पी. भ्रष्टाचार भारताचा अंतस्थ शत्रू रोहन प्रकाशन पुणे 2006
5.मेरे जी. एल. भ्रश्टाचाराची मुळे लोकमित्र प्रकाशन पुणे 2010
6.गोडबोले माधव भारताच्या संसदीय लोकशाहीची अग्निपरीक्षा राजहंस प्रकाशन पुणे 2012
7.पाध्ये यशवंत भ्रष्टाचार मनोरमा प्रकाशन मुंबई 1998
8.पुढारी 28 जुलै 2013

Publish Research Article
International Level Multidisciplinary Research Journal
For All Subjects

Dear Sir/Mam,
We invite unpublished research paper.Summary of Research Project,Theses,Books and Books Review of publication,you will be pleased to know that our journals are

Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

Associated and Indexed,USA

- Google Scholar
- EBSCO
- DOAJ
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Indian Streams Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.net